POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

गणपती बाप्पा मोरया

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र



○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-३५ ● मुंबई, शनिवार,०६ सप्टेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## मुंबईकरांनो सावधान !

## आज गाड्यांपेक्षा सार्वजनिक वाहतुकीचा वापर करा



### गणेश विसर्जन काळात मुंबईत जड वाहनांना बंदी

गणेश विसर्जन मिरवणुकांमुळे होणारी प्रचंड गर्दी आणि वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी वाहतूक विभागाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. ६ सप्टेंबर रोजी सकाळी ७ वाजल्यापासून ते ७ सप्टेंबरच्या मध्यरात्री १२ वाजेपर्यंत (संपूर्ण ४१ तास) बृहन्मुंबई परिसरात अवजड वाहनांना प्रवेश पूर्णपणे बंद राहणार आहे. या निबंर्धामुळे मोठ्या ट्रक, कंटेनर, ट्रेलर आणि इतर जड वाहनांना शहरात प्रवेश मिळणार नाही. यामुळे विसर्जन मार्गांवरील वाहतुकीची गती सुरळीत राहील आणि मिरवणुका तसेच भाविकांच्या हालचालीला अडथळा येणार नाही, अशी माहिती वाहतूक पोलिसांनी दिली आहे. दरम्यान, उत्तर मुंबईतून दक्षिण मुंबईकडे किंवा दक्षिण मुंबईतून उत्तर मुंबईकडे प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना पयार्यी मार्ग म्हणून कोस्टल रोड (धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मार्ग) वापरण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. यामुळे मुख्य रस्त्यांवरील ताण कमी होईल आणि वाहतुकीचं नियोजन अधिक प्रभावी ठरेल.



■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

मुंबईत दरवर्षीप्रमाणे यंदाही गणेशोत्सव मोठ्या थाटामाटात आणि भक्तिभावाने साजरा केला जात आहे. उद्या, शनिवार ६ सप्टेंबर रोजी लाडक्या बाप्पाला निरोप देण्यासाठी शहरभरात गणेशमूर्तींचे विसर्जन होणार आहे. विशेषतः स्वराज्यभूमी गिरगाव चौपाटी येथे भव्य विसर्जन मिरवणुका निघणार असून, लालबागचा राजा तसेच इतर मोठ्या मंडळांच्या गणपती मूर्तींचं विसर्जन येथेच पार पाडलं जाणार आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई वाहतूक पोलिसांनी शहरातील वाहतूक व्यवस्थेत व्यापक बदल केले आहेत. भायखळा, नागपाडा, काळबादेवी आणि डी. बी. मार्ग वाहतूक विभागांतर्गत येणाऱ्या रस्त्यांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आलं आहे. विसर्जन मिरवणुकीदरम्यान रस्ते मोकळे ठेवण्यासाठी तात्पुरती वाहतूक व्यवस्था लागू केली गेली आहे. गदीर्चे प्रमाण लक्षात घेता काही मार्गांवर वाहतूक वळवण्यात येणार आहे, तर काही ठिकाणी पार्किंगला पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे. पोलिसांकडून नागरिकांना आवाहन करण्यात आलं आहे की, विसर्जनाच्या दिवशी शक्यतो सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करावा आणि वाहतूक पोलिसांनी दिलेल्या सूचनांचं पालन करावं. यामुळे विसर्जन सोहळा सुरळीत पार पडेल आणि नागरिकांचा त्रासही कमी होईल. वाहनचालकांनी फ्री वे (विलासराव देशमुख पूर्व मुक्त मार्ग) / अटल सेतु मार्गे प्रवास करताना पुढील मागार्चा अवलंब करावा

### नागरिकांसाठी इएरळ आणि लोकल ट्रेनचा पर्याय

मुंबई पोलिसांच्या वाहतूक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, अनंत चतुर्दशीच्या दिवशी म्हणजेच शनिवार, ६ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी १२ वाजल्यापासून पुढील दिवशी पहाटे ६ वाजेपर्यंत शहरातील अनेक महत्त्वाचे रस्ते पूर्णपणे बंद राहणार आहेत. विसर्जन मिरवणुका आणि गर्दी लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. या काळात नागरिकांची गैरसोय कमी करण्यासाठी विशेष वाहतूक उपाययोजना आखण्यात आली आहे. मुंबईकरांना खासगी वाहनांऐवजी जास्तीत जास्त प्रमाणात सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. इएरळ बससेवा आणि लोकल ट्रेन यांचा वापर नागरिकांसाठी सोयीस्कर ठरेल, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. विशेष म्हणजे, विसर्जनाच्या दिवशी मुंबईकरांना सोयीसाठी मध्य, हार्बर आणि पश्चिम अशा तिन्ही मार्गांवरील लोकल ट्रेन सेवा रात्रभर अखंड सुरू राहणार आहे. यामुळे मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या भाविकांना आणि अन्य नागरिकांना घरी परतण्यास कोणताही अडथळा येणार नाही.

### गणेश विसर्जन मिरवणुकांवर पावसाचे सावट



देण्यात आला आहे. यामुळे या भागातील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मराठवाड्यात विजांच्या कडकडाटासह पाऊस अपेक्षित आहे, तर विदर्भात केवळ हलक्या सरींचा अंदाज आहे.

#### धरणे भरली, नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

राज्यातील चांगल्या पावसामुळे अनेक धरणे भरून वाहत आहेत. नाशिक जिल्ह्यातील गिरणा धरण पूर्ण क्षमतेने भरल्याने पाणीपुरवठा आणि सिंचनाचा प्रश्न सुटला आहे, मात्र धरणाचे दरवाजे उघडण्यात आल्यामुळे नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागानुसार, सप्टेंबर महिन्यात देशात सरासरीपेक्षा जास्त पाऊस अपेक्षित आहे, ज्यामुळे महाराष्ट्रातही पावसाचे प्रमाण वाढेल.

#### ऑरेंज आणि यलो अलर्ट जारी

हवामान विभागाने ठाणे, पालघर, नंदुरबार, नाशिक आणि पुणे घाट परिसरासाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे, तर मुंबई, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, धुळे, जळगाव, सातारा आणि कोल्हापूरसाठी यलो अलर्ट

फ्री वे (विलासराव देशमुख पूर्व मुक्त मार्ग) / अटल सेतु वरून प्रवास सुरू करा

पी. डिमेलो मार्ग ☞ कल्पना जंक्शन (उजवे वळण)

भाटीया बाग जंक्शन (उजवे वळण) ☞ सी.एस.एम.टी. जंक्शन (डावे वळण)

महापालिका मार्ग ☞ मेट्रो जंक्शन (उजवे वळण)

श्यामलदास मार्ग ☞ श्यामलदास जंक्शन (डावे वळण)

प्रिंसेस स्ट्रीट ☞ कोस्टल रोड (धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मार्ग) उत्तर वाहिनी

उत्तर मुंबई ☞ दक्षिण मुंबई (फ्री वे / अटल सेतु मार्गे)

कोस्टल रोड दक्षिण वाहिनी ☞ प्रिंसेस स्ट्रीट (उजवे वळण)

श्यामलदास जंक्शन ☞ श्यामलदास मार्ग

मेट्रो जंक्शन (डावे वळण) ☞ महापालिका मार्ग

सी.एस.एम.टी. जंक्शन (उजवे वळण) ☞ भाटीया बाग जंक्शन (डावे वळण)

कल्पना जंक्शन ☞ पी. डिमेलो मार्ग

फ्री वे (विलासराव देशमुख पूर्व मुक्त मार्ग) / अटल सेतु दक्षिण वाहिनी

प्रमुख विसर्जन स्थळे (मुंबई)

गिरगाव चौपाटी, शिवाजी पार्क चौपाटी, जुहू चौपाटी, मालाड मालवणी टी-जंक्शन, पवई (गणेश घाट)

कुलाबा वाहतूक विभागातील बंद असलेले रस्ते

१. नाथालाल पारेख मार्ग भाई बंदरकर चौक (बधवार पार्क जंक्शन) ☞ सय्यद मोहम्मद जमादार चौक (इंदु क्लिनिक जंक्शन) पर्यंतचा मार्ग वाहतुकीकरीतादोन्ही वाहिन्यांवर बंद राहील.

पयार्यी मार्ग : भाई बंदरकर चौक ☞कॅ. प्रकाश पेठे मार्ग ☞झुलेलाल मंदिर चौक (पांडे लेन जंक्शन)☞ पुढे इच्छित स्थळ

कॅप्टन प्रकाश पेठे मार्ग संत गाडगे महाराज चौक (धनपाल नाका) ☞ झुलेलाल मंदिर चौक (पांडे लेन जंक्शन) पर्यंतचा मार्ग वाहतुकीकरीतादोन्ही वाहिन्यांवर बंद राहील.

पयार्यी मार्ग : संत गाडगे महाराज चौक ☞ साधु टि.एल. वासवानी मार्ग ☞ वर्ल्ड ट्रेड सेंटर ☞ उजवे वळण मेकर टॉवर ☞ उजवे वळण जी.डी. सोमानी मार्ग ☞ झुलेलाल मंदिर चौक (पांडे लेन जंक्शन) ☞ पुढे इच्छित स्थळ

मरीन ड्राईव्ह वाहतूक विभाग

१. नेताजी सुभाषचंद्र बस मार्ग उत्तर संभाजी महाराज वाहिनीवरील सागरी वाहतूक आवश्यकतेनुसार वळविण्यात येईल. पयार्यी मार्ग : इस्लाम जिमखाना ☞ छत्रपती मार्ग ☞ कोस्टल रोड मार्गे वाहतूक वळविली जाईल.

आझाद मैदान वाहतूक विभाग

१. महानगरपालिका मार्ग सी.एस.एम.टी. जंक्शन ☞वासुदेव बळवंत फडके चौक (मेट्रो जंक्शन) पर्यंतचा मार्ग वाहतुकीकरीतादोन्ही वाहिन्यांवर बंद राहील.




## ४०० किलो आरडिएक्स सह १४ दहशतवादी भारतात घुसले; आत्मघातकी हल्ल्याची धमकी देणारा मुंबई पोलिसांना मेसेज




■मुंबई। प्रतिनिधी :

राज्यात गणेशोत्सवाचा उत्साह असताना सार्वजनिक गणपती विसर्जनापूर्वी मुंबई पोलिसांना धमकीचा मेसेज आला आहे. मुंबई वाहतूक पोलिसांच्या व्हॉट्सअपवर आत्मघातकी हल्ल्याची धमकी आल्याने खळबळ माजली आहे. मुंबई शहरात ३४ वाहनांमध्ये जवळपास ४०० किलो आरडिएक्स प्लांट केले असून १ कोटीहून अधिक लोकांना मारण्याची ही योजना असल्याचं मेसेजमध्ये उल्लेख आहे. या मेसेजनुसार, लष्कर ए जिहादीचे १४ पाकिस्तानी दहशतवादी भारतात घुसले आहेत असा दावा करण्यात आला आहे. पाकिस्तानी दहशतवादी संघटनेचा सदस्य असल्याचा मेसेज पाठवणाऱ्या व्यक्तीने दावा केला आहे. सप्टेंबर ३ तारखेला संध्याकाळी मुंबई वाहतूक पोलिसांच्या सोशल मिडिया व्हॉट्सअप नंबरवर हा मेसेज आला होता. या मेसेजची तात्काळ दखल घेत मुंबई पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला ही बाब कळवली. त्यानंतर सुरक्षा यंत्रणांनी मेसेज पाठवणाऱ्याची चौकशी सुरू केली आहे. या धमकीमुळे पोलीस सतर्क झाले आहेत. ठिकठिकाणी नाका तपासणी आणि कडेकोट बंदोबस्त लावण्यात आला आहे. ऑगस्टमध्येही अशाच प्रकारे वरळीतील एका हॉटेलमध्ये बॉम्ब ठेवल्याचा ईमेल नियंत्रण कक्षाला प्राप्त झाला होता. हॉटेलच्या ३ व्हिआयपी रूममध्ये ब्लास्ट होणार असल्याचा दावा करण्यात आला होता. जुलैमध्येही बॉम्बे स्टॉक एक्सचेंज उडवण्याची धमकी देणारा ईमेल यंत्रणेला मिळाला होता. या धमकीमुळे बीएसई इमारतील काही काळ दहशतीचं वातावण पसरले होते. सुरक्षा जवानांनी दलाल स्ट्रीट परिसर आणि संपूर्ण दक्षिण मुंबईत चोख सुरक्षा व्यवस्था ठेवली. दरम्यान, मुंबईत सध्या गणेशोत्सव सुरू आहे.

मोठ्या प्रमाणात गणेशभक्त विसर्जनाच्या दिवशी रस्त्यांवर, चौपाटीवर गर्दी करतात. गणेश विसर्जनाच्या एक दिवस आधी मिळालेल्या या धमकीच्या मेसेजमुळे पोलीस यंत्रणा सतर्क झाली आहे. मुंबई पोलिसांनी शहरातील सुरक्षा व्यवस्था वाढवण्यासोबतच धमकीचा मेसेज पाठवणाऱ्याचा शोध सुरू केला आहे. काही दिवसांपूर्वी कळवा रेल्वे स्टेशन उडवण्याची धमकी देणाऱ्या व्यक्तीला पोलिसांनी अटक केली होती. त्यानंतर आता मुंबई वाहतूक पोलिसांना आलेला मेसेजची खातरजमा पोलिसांकडून केली जात आहे.

## १८ हजार पोलिसांचा बंदोबस्त, १० हजार कॅमेरे, ड्रोनची नजर अन पहिल्यांदाच अकचं लक्ष; विसर्जनासाठी हायटेक मुंबई पोलीस सज्ज!



■मुंबई । प्रतिनिधी,

महाराष्ट्रासह संपूर्ण मुंबईत उद्या (६ सप्टेंबर) अनंत चतुर्दशी निमित्त लाडक्या बाप्पाला निरोप देण्याची वेळ येणार आहे. दरवर्षीप्रमाणेच यंदाही लाखो गणेशभक्त आपल्या आराध्य दैवताला विसर्जनासाठी घेऊन चौपाट्यांकडे रवाना होतील. विशेषतः दक्षिण मुंबईतील गिरगाव चौपाटीवर प्रचंड गर्दी उसळण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्ताची तयारी केली आहे. सुरक्षेच्या दृष्टीने वाहतूक व्यवस्थापनापासून ते गर्दीवर नियंत्रण ठेवण्यापर्यंत सर्व बाबींवर विशेष लक्ष दिले जात आहे. आज सह पोलीस आयुक्त (कायदा आणि सुव्यवस्था) सत्यनारायण चौधरी आणि सह पोलीस आयुक्त (वाहतूक) अनिल कुंभारे यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत गणपती विसर्जनाच्या दिवशी घेतलेल्या सुरक्षा उपाययोजना आणि वाहतूक नियोजनाची सविस्तर माहिती देण्यात आली. मुंबईत आज गणेश विसर्जनाचा महापर्व असल्याने वाहतूक आणि कायदा-सुव्यवस्था सुरळीत राखण्यासाठी मुंबई पोलीस प्रशासन पूर्ण सज्ज झाले आहे. याशिवाय, आधुनिक तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्याची तयारी पोलिसांनी केली आहे. संपूर्ण शहरातील प्रमुख मार्गांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले असून ड्रोनच्या सहाय्याने विसर्जन मिरवणुकींवर आणि गर्दीच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवले जाणार आहे. सुरक्षेच्या दृष्टीने विशेष नाकेबंदी, नियंत्रण कक्ष आणि तात्काळ कारवाईसाठी आपत्कालीन पथकेही सज्ज करण्यात आली आहेत. त्यामुळे गणेशभक्तांनी निर्धास्तपणे बाप्पाच्या निरोप सोहळ्यात सहभागी व्हावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. मुंबईत यंदाच्या गणेश विसर्जनासाठी पोलिसांनी अभूतपूर्व तयारी केली असून, प्रथमच बंदोबस्तात कृत्रिम बुद्धिमत्ता वापरण्याची घोषणा करण्यात आली आहे. शहरातील प्रमुख चौक, रस्ते आणि समुद्रकिनाऱ्यांवर सुरक्षा उपाय पूर्णत्वास गेले आहेत. घरगुती गणपतींपासून ते मोठ्या मंडळांच्या विसर्जन मिरवणुकीपर्यंत प्रत्येक टप्प्यासाठी स्वतंत्र नियोजन केले गेले आहे. गिरगाव चौपाटीसह विविध विसर्जन स्थळांवर बीएसमी दल, स्वयंसेवक आणि मोठ्या संख्येने पोलीस तैनात असतील. सुरक्षेच्या दृष्टीने यंदा १० हजार सीसीटीव्ही कॅमेरे शहरभर लावण्यात आले आहेत, तर ड्रोन कॅमेऱ्यांद्वारे गर्दी आणि मिरवणुकींवर बारकाईने लक्ष ठेवले जाईल. पोलिसांच्या पेट्रोलिंग गाड्या सातत्याने गस्त घालतील आणि नियंत्रण कक्ष सतत कार्यरत राहील. विशेष म्हणजे, पोलिसांनी प्रथमच एआय तंत्रज्ञानाचा वापर करून गदीर्चे व्यवस्थापन आणि संशयास्पद हालचाली ओळखण्याची तयारी केली आहे. नागरिकांनी विसर्जनावेळी पोलिसांच्या सर्व सूचनांचे पालन करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

सह पोलीस (आयुक्त कायदा व सुव्यवस्था)

सह पोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) सत्यनारायण चौधरी यांनी गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा बंदोबस्ताबाबत महत्त्वाची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून घोषित झाल्याने मुंबई पोलिसांनी महापालिकेसोबत मिळून अभूतपूर्व तयारी केली आहे. मुंबईत तब्बल ६,५०० सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आणि अंदाजे दीड ते दोन लाख घरगुती गणपती आहेत. विसर्जनासाठी ६५ नैसर्गिक ठिकाणे आणि २०५ कृत्रिम तलाव उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

## कबुतर जा जाङ्गदादरमधील कबुतर अखेर उडाले

■मुंबई । प्रतिनिधी,



न्यायालयाच्या निदेर्शानंतर मुंबईतील दादरसह अनेक भागांमधील कबुतरखाने बंद करण्यात आले आहेत. दादर पश्चिम येथील कबुतरखान्यावर ताडपत्री लावल्यानंतर येथील दाणापाणी बंद केला, यानंतर तेथील कबुतरांनी आता हा परिसर सोडल्याचे पाहायला मिळत आहे. कबुतरखाना बंद केल्यानंतर येथील कबुतरांचे आसपासच्या इमारतींवर वास्तव्य असायचे, दिवसा ते पिंपळाच्या झाडांवर आणि जैन मंदिराच्या कौलांवर असायचेल तर रात्रीच्या वेळी सोलो इमारतीवर वास्तव्य कतराना पाहायला मिळायचे. मात्र काही दिवसांपासून त्या ठिकाणचे कबुतर गायब झाल्याचे दिसून येत आहे. तसेच, तेथील काही विक्रेत्यांचे देखील असे मत आहे की, झाडांवरुन होणारी विष्ठेचे प्रमाण कमी झाले आहे. यामुळे आता छत्री न लावता व्यवसाय करता येत आहे. मुंबईतील दादरमधील कबुतरखाना न्यायालयाच्या निदेर्शानंतर हटवण्यात आला होता. न्यायालयाच्या कठोर निदेर्शानंतर देखील त्या ठिकाणी जैन बांधवांनी मोठे आंदोलन केले होते. या आंदोलनामुळे चांगलाच वाद निर्माण झाला होता. न्यायालयाच्या निदेर्शानंतर महापालिकेने हा कबुतरखाना बंद करण्यासाठी स्वच्छता करुन ताडपत्री लावली होती. परंतु जैन समाजाने आक्रमक होत ताडपत्री काढून टाकण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतर महापालिकेच्या वतीने दादर कबुतरखाना कायमस्वरुपी बंद केला. सतेच खाद्य पुरवणाऱ्यांवर देखील कारवाई करण्याचे आदेश असल्याने या ठिकाणी दाणे टाकणेही बंद झाले आहे. यामुळे आता कबुतरांनी अन्नाच्या शोधात अन्य जागी स्थलांतर केल्याचे दिसून येत आहे.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# वरुणराजाचे तांडव



महाराष्ट्रासह देशातील विविध राज्यांमध्ये पावसाचे तांडव सुरू असून अनेक तालुक्यांमध्ये पूरसदृश चिंतेचे वातावरण आहे. महाराष्ट्रापुरते बोलावयाचे झाल्यास मुंबई शहर, उपनगर, ठाणे, पालघर, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, पनवेल, उरण, वसई-विरार आदी भागांमध्ये अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागले आहे. दरवर्षी होणाऱ्या पावसाचा कोकण भागातील धुमाकूळ ही नित्याचीच बाब झाली आहे. दरवर्षीच्या पावसाळा कालावधीतील अतिवृष्टी एव्हाना कोकणी माणसाच्याही अंगवळणी पडलेली आहे. गणेशोत्सवामध्ये दरवर्षी हमखास पाऊस असतोच. यंदाही पावसाने आपल्या उपस्थितीचे अस्तित्व दाखवून दिले आहे. जून ते सप्टेंबर असा पावसाचा हंगाम असला तरी यंदा पावसाने मे महिन्यापासूनच सुरुवात केलेली आहे. मे महिन्यात अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावत महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात अनेक ठिकाणी जून-जुलै महिन्यांत दडी मारली होती. अवकाळी पावसामुळे शेतातील पिकांनाही ऐन कडाक्याच्या उन्हाळ्यात संजीवनी प्राप्त झाली होती; परंतु ऑगस्ट महिन्यात ग्रामीण भागात झालेल्या अतिवृष्टीने जून-जुलै महिन्यांचा बॅकलॉग भरून काढला होता. पंजाब, जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये पाऊस थैमान घालत आहे. या राज्यांमध्ये अनेक ठिकाणी पूर आणि भूस्खलनाच्या घटना घडल्या आहेत. यामुळे आतापर्यंत अनेकांना प्राण गमवावे लागले असून, हजारो लोकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित केले. पंजाबमधील आठ जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसानंतर १०१८ गावांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. पूर आणि पावसामुळे राज्यात आतापर्यंत ८ जणांचा मृत्यू झाला असून ३ जण बेपत्ता आहेत. प्रशासनाने तातडीने बचावकार्य हाती घेत ११ हजारांहून अधिक लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवले. रावी नदीची पाण्याची पातळी वाढल्याने गुरुदासपूर जिल्ह्यातील घोणेवाले येथील धुस्सी बंधारा फुटला. देशाच्या उत्तर आणि वायव्य भागाबरोबरच मध्य भागातही बुधवारी मुसळधार पाऊस झाला. पूरग्रस्त पंजाब आणि हरियाणामध्ये गेल्या काही आठवड्यांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मोठा भूभाग पाण्याखाली गेला असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. पंजाबमधील अमृतसर, लुधियाना, पतियाळा, पठाणकोट, गुरसादपूर आणि मोहाली या जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस झाला, तर हरियाणाच्या अंबालामध्ये या कालावधीत १०५.६ मिमी इतका पाऊस झाला. दोन्ही राज्यांची राजधानी असलेल्या चंडिगडमध्ये ६३.६ मिमी पाऊस झाला. हरियाणातील घग्गर, मार्कंडा आणि टांगरी या नद्यांच्या पाण्याची पातळी वाढत आहे. पंजाबच्या सतलज, बियास आणि रावी या नद्यांसह हंगामी उपनद्यांची पातळी वाढल्यामुळे त्या राज्यात मोठ्या प्रमाणात पूर आला आहे. पंजाबमध्ये एनडीआरएफ, लष्कर, बीएसएफ, पोलीस आणि जिल्हानिहाय प्रशासन यांच्यामार्फत पूरग्रस्त भागांमध्ये मदत व बचावकार्य सुरू आहे. छत्तीसगडच्या बलरामपूर जिल्ह्यात अचानक आलेल्या पुरामुळे चार जणांचा मृत्यू झाला आणि अन्य तिघे जखमी झाले अशी माहिती अधिकाऱ्यांनी बुधवारी दिली. पंजाब, जम्मू-काश्मीर, उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेश या पूरग्रस्त प्रदेशांसाठी तातडीने विशेष मदतीचे पॅकेज जाहीर करावे, अशी विनंती विरोधी पक्षांकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे करण्यात आली आहे. लहरी हवामानामुळे उन्हाळ्यात पाऊस असतो, तर पावसाळ्यात उकाडा जाणवतो आणि थंडीच्या काळात पाऊस, कडाक्याचे ऊन या दोन्हींचा मिलाफ पाहावयास मिळतो. हवामानातील बदल जरी विनाशास हातभार लावत असला तरी प्रशासनाला या घडामोडीतील हानी रोखण्यासाठी आलेल्या अपयशाचे खापर हे निश्चितच प्रशासनावर फोडले पाहिजे. भूतलावरील वृक्षसंपदेचे घटते प्रमाण ही प्रामुख्याने मुख्य बाब मानली जात आहे. वृक्षसंपदा कमी झाल्याने भूसंखलनाचे प्रमाण वाढले आहे. वृक्षांची जमिनीमध्ये खोलवर गेलेली मुळे ही जमीन पकडून ठेवण्यास महत्त्वाची भूमिका बजावत असते. तसेच थोडा जरी पाऊस पडला तरी आपणाकडे नदी-नाले तुडुंब भरले. धरणे-तलाव ओव्हर फ्लो झाले, असे वाचावयास मिळते; परंतु वास्तविकता काही वेगळीच असते. नदी, नाल्यामध्ये सभोवतालची माती-गाळ वाहत येत असतो. अनेक वर्षे आपल्या नद्या, तलाव, धरणातील गाळ काढण्यात न आल्याने तलाव व समुद्राची खोली कमी होत चालली असून याचा साठा क्षेत्रावरही प्रतिकूल परिणाम झालेला आहे. याचे उत्तम उदाहरण आपणास हार्बर रेल्वे मार्गावरील वाशी खाडीपुलावर दिसून येते. १९९०च्या सुमारास वाशी खाडीपुलावरून मुंबई आणि नवी मुंबई दरम्यान रेल्वे सुविधा उपलब्ध झाली. आज जवळपास ३५ वर्षे या घटनेला लोटली आहेत. या साडेतीन दशकांमध्ये वाशी खाडीमध्ये सभोवतालच्या भागातील कचरा, माती नाल्यांच्या माध्यमातून विसावला आहे.

या खाडीतील गाळ, माती प्रशासनाकडून आजतागायत काढण्यात आलेली नाही. त्यामुळे वाशी खाडीपुलावरील रेल्वे आणि खाडीतील पाणी यामध्ये एकेकाळी खूप अंतर होते, पण आता ते अंतर मोठ्या प्रमाणावर कमी झाले असून पावसाळ्यात वरून कोसळणारा पाऊस आणि खाडीच्या लाटा व त्यातून धावणारी रेल्वे पाहिल्यावर खाडीतील पाणी काही अंतरावर येऊन ठेपल्याचे स्पष्टपणे दिसून येते. बद्रीनाथ, केदारनाथ यांसह अन्य धार्मिक स्थळांवर पावसाळ्यात अडथळे येत असल्याने या यात्रा दरवर्षीच स्थगित कराव्या लागतात. पाऊस तर दरवर्षी पडत असतोच, तो हानी करणार याचीही आपणास माहिती असते. मग आपण उपाययोजना का करत नाही? हानी टाळण्यासाठी उरलेल्या आठ महिन्यांत उपाययोजना का करत नाही? उत्तरे आपणास शोधावीच लागतील, अन्यथा हा निसर्गाचा प्रकोप, वरुण राजाचे तांडव यामुळे वसुंधरेवरील जीविताच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह निर्माण होण्यास फारसा वेळ लागणार नाही.

# बुद्धीची देवता



संपूर्ण जनतेच्या ममत्त्वाचा, दैवत्वाचा, अस्मितेचा, श्रद्धाळू असा हा एकमेव गणेश. गणरायाचे आगमन म्हणजे सर्वांसाठी आनंदाची पर्वणीच असते. जोरदार सरींची बरसात झेलून सुखावलेले समस्त जीव आता उत्सव पर्वामध्ये चिंब भिजण्यासाठी सज्ज झाले आहेत. विघ्न दूर करून सुखाची चाहूल देणाऱ्या बाप्पाचे आज आगमन झाले. ऐलमा, पैलमा गणेश देवा, माझा खेळ मांडू दे करीन तुझी सेवा... अवतीभवतीचा आनंद व उत्साहाच्या हिरव्यागार वातावरणात भाविकांनी गणेशाचे स्वागत केले. प्रत्येकाच्या घरोघरी उत्सवाची सज्जता सुरू असल्यामुळे भारलेले वातावरण अनुभवायला मिळत असते. वास्तविक गणेश हा विद्येचा देव आणि ज्ञानाचा अधिपती. सण आणि उत्सव साजरे करताना आपण संस्कृती परंपरेचा प्रवाह पुढे नेत असतोच. आपल्या समाज सुधारकांनी मात्र उत्सव आणि परंपरा यांचा विचार राष्ट्रासाठी कसा केला याचे उत्तम उदाहरण म्हणजे सार्वजनिक गणेशोत्सव. सार्वजनिक गणेशोत्सवाचा उल्लेख जेव्हा जेव्हा होतो तेव्हा लोकमान्य टिळकांचे स्मरण होणे स्वाभाविक आहे. गणेशोत्सवाची सुरुवात झाली ती भारतीयांना एकत्र आणण्यासाठी, विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी. १८९३ साली स्थापन केलेला सार्वजनिक गणेशोत्सव म्हणजे युवकांमध्ये राष्ट्रतेज जागृत करण्याचा अनोखा प्रयत्न. जो पुढे जाऊन यशस्वी झाला. एका मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठापासून सुरुवात होऊन घराघरांत, मंडपात गणराज विराजमान झाले आहेत. जीवनात अनोखे रंग भरणारा, स्नेह, प्रेम वाढवणारा हा उत्सव आहे. आजच्या घडीचे संघटन, शक्तीचे प्रतीक दर्शविते. हे सर्व करत असताना या आनंदमय वातावरणात सर्व समाजाने एकत्र यावे त्यांच्यात बंधुभाव वाढीस लागावा, एकमेकांप्रती प्रेम, आपुलकी निर्माण व्हावी या उदात्त हेतूने सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात करण्यात आली. चातुमार्सात श्रावणसरींनी आलेला पाऊस आपल्याबरोबर हिंदू सणांना घेऊन येतो. हिंदू धमार्तील ईश्वराची रूपे वेगळी असली तरी शेवटी सर्वांचा ईश्वर एकच आहे. हे निस्सीम सत्य विसरता कामा नये. चौदा विद्या, चौसष्ट कलेचा अधिपती असलेल्या श्रींचे आगमन सर्वांसाठी आनंदरुपी अमृत सोहळा आहे. बाप्पा आला रे आला... किती जिव्हाळ्याचा आतून येणारा आवाज. गोंडस, गोजिरवाणा, लोभस, लडिवाळ, सर्वांच्या लाडक्या गणपती बाप्पाचे आगमन वाजत गाजत मोठ्या उत्साहात घरोघरी, गल्लोगल्ली, शहरात तसेच गावात झाले आहे. घरामध्ये गणपती बाप्पा जेव्हा विराजमान होतात तेव्हा घराचे मंदिर आपोआपच होऊन जाते. या पवित्र वातावरणात कधी दहा दिवस संपतात तेच समजत नाही. यामध्ये गौरी आगमन, गौरी पूजन व गौरी गणपती विसर्जन हे सण उत्सव आनंदात साजरे केले जातात. आपल्याकडे सर्व असतातच यासाठीच की मरगळलेल्या मनाला पुन्हा चैतन्य ऊर्जा मिळावी ही ऊर्जा मिळताना मनामध्ये पवित्र भाव असावा. अनेक पिढ्यान पिढ्यांपासून बाप्पाची अतिशय मनोभावे पूजा केली जाते. लहान मुलांपासून ते वडीलधाऱ्यापर्यंत श्री गणेशाचे आगमन झाल्यावर प्रत्येकजण बाप्पाची सेवा करण्यात दंग होऊन जातो. कारण गणेश दैवत हे बुद्धीची देवता आहे. तसेच तो विघ्नहर्ता ही आहे. प्रथम पूजेचा शुभारंभाचा मान श्री गणेशाकडे जातो. अशा गणाचा अधिपती असलेल्या श्री गणेशाचे स्थान आपल्या आयुष्यात अनन्यसाधारण आहे. बाप्पाचा आवडता प्रसाद मोदक. बाप्पाच्या नैवेद्याचा आधीच जिभेवर उड्या मारायला लागतो. या दिवसात एक वेगळेच वातावरण न्याहाळायला मिळत असते. बाप्पा विराजमान झाल्यावर विविध सुगंधी अगरबत्यांचा दरवळणारा सुवास, शेणाने सारवलेले अंगण, मातीच्या भितींना केलेली पानाफुलांची रंगरंगोटी, दाराला लावलेले तोरण, रांगोळीने सजलेले अंगण मन प्रसन्न करते. बाप्पाच्या आगमनामुळे रक्ताची नाती जवळ येतात, उत्साह, आनंदाचे वातावरण निर्माण होते. वक्रतुंड महाकाय, सूर्यकोटि समप्रभे निर्विघ्न कुरुमे देव, सर्वकायेर्षु सर्वदा! गोलाकार सोंडेचा, विशाल शरीराचा, सूर्या समान तेजस्वी अशा विघ्नहतार्ची आमच्यावर कृपा असावी. आपल्या या वैदिक संस्कृतीमध्ये एक दयाळू देवता श्री गणेश विघ्नहर्ता बुद्धिवंत, सामर्थ्यवंत, शक्तीवन्त, रूपवंत देवता आहे. गणेश या संस्कृत शब्दाप्रमाणे अर्थ गण म्हणजे समूह तर ईश म्हणजे परमेश्वर. गणपती म्हणजे प्राणिमात्रांच्या समूहाचे रक्षण करणारा रक्षक. गणेश हा महादेव आणि पार्वतीचा पुत्र आहे. याबद्दलची गोष्ट प्रत्येकाला माहीतच आहे. भाद्रपद शुक्ल चतुर्थीपासून वेद व्यासांनी डोळे मिटवून भागवत कथा सलग दहा दिवस गणपतीला ऐकवली. जी गणपतीने आपल्या दाताने लिहिली. दहा दिवसानंतर जेव्हा व्यासांनी डोळे उघडले तेव्हा त्यांनी पाहिले की, गणेश एका जागी सतत बसून लिहिल्यामुळे अतिशय उष्णता शरीरात निर्माण झाली. त्यामुळे जवळील पाण्याच्या कुंडात वेद व्यासांनी त्यांना थंड केले. त्यामुळेच भाद्रपद शुक्ल चतुर्थीला गणरायाची स्थापना केली जाते आणि शितल करण्यासाठी अनंत चतुर्दशीला विसर्जन केले जाते. गणेश उत्सव हा बाल आणि तरुणांसाठी एक आनंदोत्सवच असतो. अशा वातावरणात कल्पनाशक्तीला वाव मिळतो. कौशल्याच्या सादरीकरणाची संधी मिळते. नवनवीन मित्र-मैत्रिणी गवसतात, एकत्र काम केल्यामुळे सुसंवादाला चालना मिळते. सगळे एका पातळीवर येऊन काम करत असल्यामुळे जवळीकता वाढते. एकप्रकारे या अनौपचारिक वातावरणात मैत्री फुलते. दोस्ती घट्ट होते. एकंदरीत संपूर्ण समाज या महोत्सवात विरघळून जातो, रममान होतो. श्री गणेश विद्येची देवता आहे. तसेच ती कलेची ही देवता आहे. त्यामुळे कलाकार मंडळी ही गणेश उत्सवामध्ये आपली कला सादर करण्यासाठी रंगून गेलेले असतात. गणपतीसमोर ठेवलेले लाडू, मोदक असे गोड पदार्थ लहान मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वांनाच आवडतात. त्यामुळे गणेशोत्सवामध्ये बाळ गोपाळही रमून जातात. काहींच्या घरी दीड दिवसाचे गणपती तर काहींच्या घरी सात दिवसांचे गणपती असतात. पंचमी दिवशी दीड दिवसाचे गणपती जातात. त्यादिवशी ऋषीपंचमी साजरी केली जाते. याच दिवसात गौरीचे आगमन होते. गौरी पूजन आणि विसर्जनाचा सोहळा पार पडतो. काही गणपतीचे विसर्जन गौरी सोबतच होते. अनंत चतुर्दशीच्या दिवशी सर्वच गणपतीचे विसर्जन होते. गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या. गणपती गेले गावाला, चैन पडेना आम्हाला.

# महिला सन्मानाचे नॅरेटिव्ह सेट करण्याचा आटापिटा!





निवडणूक ही मुद्यांवर, वास्तव प्रश्नावर लढायची असते हे आजच्या काळात जणू दंतकथा होऊन बसले आहे. वास्तवापासून दूर नेणारा एखादा भ्रम जनतेच्या मनःपटलावर एवढा बिंबवायचा की, ते मिथच त्यांना वास्तव वाटायला हवे. ते मोदींनी करून दाखवले आहे. केंद्रीय निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी माताभगिणींचे व्हिडिओ दाखवले पाहिजे का, हे अशा अंदाजात म्हटले होते की जणूकाही विरोधक शयनगृह किंवा स्नानगृहातीलच व्हिडिओ मागत होते. बिहारच्या निवडणुकीत आता मूळ प्रश्नांना बगल देऊन महिला सन्मानाचे नॅरेटिव्ह सेट करण्याचा आटापिटा सुरू आहे. बिहार विधानसभा निवडणूक अजून जाहीर होणे बाकी आहे, त्याआधीच वेगवेगळ्या कारणाने बिहार देशभरात चर्चेत आले आहे. सुरुवातीला निवडणूक आयोगाच्या सखोल पुनर्निरीक्षणामुळे (एसआयआर) मतदार याद्यातील घोळ समोर आला. यात असलेल्या लोकांना मृत ठरवून त्यांची नावे मतदारयादीतून गायब करण्यात आली. मृत घोषित मतदार जेव्हा सर्वोच्च न्यायालयात हजर झाले तेव्हा कुठे आयोगाने त्यांच्याबद्दल विचार करण्याची प्रक्रिया सुरू केली. मतदार हा लोकशाहीतील राजा आहे, त्याच्या अधिकारांचे सरण निवडणूक आयोग रचणार असेल तर त्याविरोधात आम्ही लढणार असा निर्धार करुन काँग्रेस नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बिहारमध्ये 'व्होटर अधिकार' यात्रा सुरू केली. या यात्रे दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दिवंगत आईबद्दल अपशब्द बोलले गेले, असा आरोप भाजपकडून केला गेला. तेव्हा मोदी चीन आणि जपान दौऱ्यावर होते. मोदी भारतात परतल्यानंतर भाजपने मोदींच्या माताजींविरोधात 'व्होटर अधिकार' यात्रेतील कथित वक्तव्यावरुन बिहार बंदची हाक दिली. सरकारमध्ये बसलेल्या पक्षांनी कारवाई करण्याऐवजी बंद पुकारायचा हा 2014 पासूनच नया भारत. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि राष्ट्रीय जनता दलाचे (आरजेडी) नेते तथा बिहार विधानसभेतील विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव यांच्या ह्यव्होटर अधिकारह्ण यात्रेदरम्यान दरभंगा जिल्ह्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दिवंगत मातोश्रींबद्दल अपशब्दांचा वापर करण्यात आल्याचा आरोप झाला. या संबंधीची अधिकृत माहिती अजून समोर आलेली नाही. पंतप्रधान मोदी भारतात आल्यानंतर त्यांनी हा माझ्या आईचा नाही तर देशातील प्रत्येक आईचा अपमान असल्याचे सांगितले. आई, माताभगिणी हा प्रत्येकाच्या आयुष्यातील अतिशय हळवा कोपरा आणि अतिशय खासगी बाब असते. पंतप्रधानच नाही तर कोणत्याही सामान्य व्यक्तीच्या आईबद्दल जर अपशब्द काढण्यात आले असतील तर ते चुकीचेच आहे. मात्र पंतप्रधानांच्या आईचा विषय पुढे आल्यानंतर भारतीय जनता पक्षाने त्याला बिहारचा ह्यराष्ट्रीयह्ण मुद्दा करुन टाकले. भाजपने थेट काँग्रेस आणि आरजेडी विरोधात मोर्चा उघडला. उलटपक्षी देशातील सर्वात तरुण विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव यांनी पंतप्रधान मोदींच्या वक्तव्यानंतर म्हटले की, कोणाच्याही आईला शिवी देणे चुकीचे आहे. ही आपली संस्कृती नाही. या देशातील दोन मोठ्या महाकाव्यांच्या मुळाशी गेलं तर तिथेही महिलांचा अपमान झालेला आहे. द्रौपदीच्या वस्त्रहरणाने महाभारत घडले तर रामायण मातासीतेशिवाय अपूर्ण राहते. पण जेव्हा देशाच्या सर्वोच्च नेत्याला आपल्या आईबद्दल बोलल्यानंतर हा देशातील सर्वच मातांचा अपमान वाटतो, तेव्हा ते सर्रास विसरलेले असतात की, आपणही कधीतरी सोनिया गांधींना 'काँग्रेस की विधवा' म्हटले होते. याची आठवण आता काँग्रेस नेते करुन देत आहेत. एनडीएच्या पहिल्या कार्यकाळात पंतप्रधान मोदी राज्यसभेत आधार कार्डबद्दल बोलत असताना काँग्रेस खासदार रेणुका चौधरी हसल्या होत्या, तेव्हा तत्कालीन सभापती एम. व्यंकय्या नायडू यांनी नाराजी व्यक्त केली होती. पंतप्रधान मोदींनी नायडूंना थांबवत म्हटले होते की, सभापती महोदय त्यांना हसू द्या, रामायणानंतर असे हास्य पहिल्यांदा ऐकले आहे. तेव्हा सत्ताधारी बाकांवर एका महिलेविरोधातील पंतप्रधानांच्या टिपण्णीने खसखस पिकली होती. तेव्हा माता भगिणींचा अपमान झाला नव्हता का? काँग्रेस नेते शशी थरुर यांच्यावर टीका करताना पचास करोड की गर्लफ्रेंड कोण म्हणाले होते. आज बिहारमध्ये राहुल गांधी आणि तेजस्वी यादव यांच्या विरोधात घोषणाबाजी करर्णाया भाजपच्या महिला नेत्यांना याचा सर्रास विसर पडलेला आहे. मणिपूरमधील भगिणींची विवस्त्र धिंड काढण्यात आली तेव्हा पंतप्रधान मोदींना देशातील मायभगिणींच्या इभ्रतीचा प्रश्न सतावला नाही. अजूनही मोदी मणिपूरला गेले नाहीत. असे किती प्रसंग आहेत ज्यांची आठवण काढली तरी अंगावर शहारा येईल. माताभगिणींबद्दलच्या अपशब्दांबद्दल बाजू कोणीच घेणार नाही, मात्र तसा गुन्हा माज्याकडून घडणार नाही याचीही शाश्वती दिली पाहिजे. कर्नाटकमध्ये भाजपचे नेते बी. पी. हरीश यांनी आयपीएस अधिकारी उमा प्रशांत यांना भरसभेत पाळलेला कुत्रा म्हटले. ही परवाची गोष्ट आहे. तर याच राज्याचे भाजपचे विधान परिषद सदस्य एन. रवीकुमार यांनी मुख्य सचिव शालिनी रजनीश यांच्याबद्दल अपमानास्पद टिप्पणी केली. महिला अधिकर्यांबद्दल भाजप नेत्यांनी केलेल्या या वक्तव्याचा बंद पाळणारे निषेध करणार आहेत का? कर्नाटकमधील भाजप नेत्याकडून अजून साधी दिलगिरी व्यक्त झालेली नाही. उलट मुख्य सचिवांबद्दल मी काहीही चुकीचं बोललो नाही, असं रवीकुमार यांनी उलट उत्तर दिले आहे. यावरुन नैतिकतेच्या धड्यांची गरज कोणाला आहे, हे सुज्ञास सांगावे न लागे. बिहार विधानसभा निवडणुकीत काँग्रेस आरजेडीकडून मतचोरीला मुद्दा केले जात आहे. महाराष्ट्रात मतचोरी करुन भाजप आणि मित्रपक्ष सत्तेत आले याचे उदाहरण दिले जात आहे. त्याच्या काऊंटरसाठी भाजपला आजपर्यंत कोणताही ठोस मुद्दा मिळालेला नाही. भावनिकतेवर निवडणूक नेण्याचा भाजपचा येथे प्रयत्न सुरू आहे. एक नॅरेटीव्ह सेट करण्याचा प्रयत्न केला जात आहे. काँग्रेस-आरजेडीचे महागठबंधन यांची संस्कृती शिव्या देण्याची आहे. यांच्याकडून महिलांचा सन्मान केला जात नाही. हे नॅरेटीव्ह पसरवण्यासाठी गुरुवारी भाजपकडून महिला मोर्चा रस्त्यावर उतरवण्यात आला. महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीपूर्वी ज्याप्रमाणे महायुतीला बहीण लाडकी झाली तसेच आता बिहारमध्ये महिला सन्मान, महिला अस्मिता हे कार्ड खेळले जात आहे. बिहारमध्ये महिला मतदारांची संख्या दोन कोटी 96 लाख आहे. त्यामुळे भाजप आणि त्यांचे सहकारी जेडीयू, पासवान यांचे प्रयत्न आहेत की माताभगिणींबद्दलच्या अपशब्दांना संपूर्ण बिहारच्या महिलांचा अपमानाचा मुद्दा बनवले जावे. याशिवाय मागास समाजातून आलेल्या नेत्याबद्दल काँग्रेस, आरजेडी यांचा काय विचार आहे. मागास समाजातून आलेल्या नेत्यांच्या आईबद्दल हे नेते कशा पद्धतीने बोलतात हे अपमानाचे, महिला अस्मितेचे नॅरेटिव्ह सेट करण्याचा भाजपचा डाव दिसत आहे. निवडणुकीमध्ये महिला मतदार अतिशय निर्णायक घटक ठरत आहे. 2020 मधील बिहार विधानसभा निवडणुकीत 243 विधानसभा मतदारसंघापैकी 167 जागांवर महिला मतदारांनी पुरुषांपेक्षा जास्त मतदान केले होते. या निवडणुकीत पुरुष मतदारांची संख्या महिलांपेक्षा सहा टक्के कमी होती. पुरुष 54 टक्के तर महिला मतदारांची संख्या 60 टक्के होती. राहुल गांधी यांच्या व्होटर अधिकार यात्रेला महिलांकडून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असल्याचे दिसत असल्यामुळेच भाजप आणि मित्रपक्षांकडून अशा पद्धतीचा डाव खेळला जात असल्यास नवल वाटायला नको. वास्तविक मुद्यांपासून मतदारांना दूर घेऊन जाणे आणि भ्रामक गोष्टींमध्ये अडकवणे हे निवडणुकीचे तंत्र आहे. त्याचाच उपयोग बिहारमध्ये येत्या काळात होणार आहे. 17 ऑगस्ट ते 1 सप्टेंबरपर्यंत राहुल गांधी आणि तेजस्वी यादव यांची व्होटर अधिकार यात्रा सुरू होती. व्होटर अधिकार यात्रेच्या निमित्ताने दोन्ही नेत्यांनी बिहारचा दौरा केला. या दरम्यान त्यांनी मतदार यादीतील अनियमिततेबद्दल लोकांमध्ये जागृती केली. मतदारांना आपल्या माताधिकाराबद्दल जागृत केले. या यात्रेमध्ये राहुल गांधी खुल्या जीपमध्ये होते तर ड्रायव्हिंग सीटवर तेजस्वी यादव दिसत होते. यामुळे येर्णाया काळात बिहारचे स्टेअरिंग देखील तेजस्वी यांच्याच हातात राहणार असा संदेश गेला. संपूर्ण यात्रेत दोन्ही नेत्यांचा जनतेसोबतचा संवाद हा अतिशय खेळीमेळीचा आणि आपलेपणाचा राहिलेला दिसला. राहुल गांधी आणि तेजस्वी यादव यांच्यासोबत या यात्रेत अखिलेश यादव, स्टॅलिन हे बाहेरील राज्यातील नेते देखील सहभागी झाले. बिहारमधील व्यक्तीला त्याच्या राज्यात रोजगार हवा आहे. दिल्लीपासून केरळपर्यंत बिहारी कामाच्या शोधात जातो.

# गणपती उत्तरपूजेला गुरुजी मिळत नाही? 'असे' करा विसर्जन पूजन, पाहा, विधी

पाहता पाहता अनंत चतुर्दशी आली. सार्वजनिक आणि हजारो घरचे गणपती बाप्पांना या दिवशी निरोप दिला जातो. गणेश चतुर्थीला आगमन झालेल्या गणपतीचे विसर्जन करताना घरातील वातावरण अगदी भावपूर्ण झालेले असते. गणपती बाप्पाला जड अंतःकरणाने निरोप दिला जातो. यंदाच्या २०२५ च्या अनंत चतुर्दशीला काही विशेष योग जुळून येत आहेत. गणपती उत्तरपूजा करण्यासाठी कोणी मिळाले नाही, तर घरीच विसर्जन पूजा करता येऊ शकते, नेमकी अशी करावी गणपती उत्तर पूजा? जाणून घ्या, संपूर्ण पूजाविधी...

दीड दिवसाचा, पाच दिवसाचा, सात दिवसाचा किंवा अगदी दहा दिवसाचा गणपती असला, तरी लाडक्या गणपती बाप्पाला निरोप देताना खूप वाईट वाटते. गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या, अशी आर्त विनवणी केली जाते. यंदा, शनिवार, ०६ सप्टेंबर २०२५ रोजी अनंत चतुर्दशी आहे. शुक्रवार, ०५ सप्टेंबर २०२५ रोजी मध्यरात्री ०३ वाजून १२ मिनिटांनी भाद्रपद शुद्ध चतुर्दशीची सुरुवात होत आहे. तर, शनिवार, ०६ सप्टेंबर २०२५ रोजी मध्यरात्री ०१ वाजून ४१ मिनिटांनी अनंत चतुर्दशी समाप्त होईल. परंतु, शनिवार, ०६ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११.२२ वाजेपासून पंचक सुरू होत आहे.

पार्थिव गणेशाची प्राणप्रतिष्ठा करण्याचा विशिष्ट पूजाविधी असतो. तसेच अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणपती विसर्जन करण्यापूर्वी पार्थिव गणपती मूर्तीची विसर्जन पूजा केली जाते. या दिवशी विधिवत गणरायाला निरोप दिल्याने पुण्य प्राप्ती होते. घरात सुख, शांती आणि समृद्धी नांदते, असे सांगितले जाते.

अनंत चतुर्दशी गणपती विसर्जन उत्तर पूजा विधी

- सकाळी उठल्यावर नेहमीप्रमाणे गणपतीची षोडशोपचार पूजा करावी.
- गणपतीला आवडणारे मोदक, लाडू, मिठाई यांचा नैवेद्य दाखवावा.
- गणपतीला नवीन वस्त्रे अर्पण करावीत.
- एका कापडात सुपारी, दुर्वा, मिठाई आणि काही पैसे घ्यावेत. या वस्तू त्या कापडात गुंडाळून गणपतीच्या मूर्तीजवळ ठेवाव्यात.
- विसर्जनापूर्वी गणपतीची मनोभावे आरती आणि जयजयकार करावा.
- गणेशोत्सव काळात अनावधानाने झालेल्या चुकांबाबत गणपतीकडे क्षमायाचना करावी.
- गणपतीच्या मूर्तीसह पूजा साहित्य, हवन साहित्य आणि अन्य वस्तू विसर्जित कराव्यात.



अनंत चतुर्दशीच्या मुहूर्तावर सुरू करा 'ही' उपासना, ६ महिन्यात मिळेल फळ!

अनंत चतुर्दशी गणपती विसर्जन उत्तर पूजा मंत्र
यातुं देवगणाः सर्वे पुजामादाय पार्थिवीम।
इष्टकामप्रसिद्ध्यर्थ पुनरागमनाय च।।

गणपतीची प्रार्थना झाल्यावर असा मंत्र म्हणून मूर्तीला अक्षता अर्पण कराव्यात. म्हणजे पूर्वी प्राणप्रतिष्ठेने आलेले देवत्व विसर्जित होते. त्यानंतर मूर्ती स्थिर आसनावरून थोडी पुढे सरकवून ठेवावी. मग मूर्ती उचलून समुद्रात किंवा कुळाचाराप्रमाणे योग्य त्या पवित्र स्थळी विसर्जित करावी. यावेळी काही ठिकाणी गणपतीच्या हातावर दही, लाह्या देण्याची परंपरा आहे. आपापले कुळधर्म, परंपरा, रिती, कुळाचाराप्रमाणे गणपती बाप्पाला निरोप द्यावा, असे म्हटले जाते.

२०२६ मध्ये गणपती बाप्पाचे आगमन कधी?

पुढच्या वर्षी बाप्पांचे आगमन १८ दिवस उशिराने होणार आहे. कारण पुढील वर्षी ज्येष्ठ अधिकमास आहे. त्यामुळे पुढच्या वर्षी गणेश चतुर्थी ही १४ सप्टेंबर २०२६ रोजी असेल.

गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या...!!!

# 'तन्नो दंती प्रचोदयात'; गणेशा समोरच का म्हणावे 'अथर्वशीर्ष'?

गणेशोत्सवात गणपतीसमोर अथर्वशीर्ष म्हणण्याला विशेष महत्त्व आहे. अथर्वशीर्ष हे अथर्ववेदाशी निगडीत उपनिषद असून, यामध्ये गणेशाचे स्वरूप, त्याचे परब्रह्म म्हणून महत्त्व आणि उपासकांसाठी मिळणारे लाभ यांचा उल्लेख आहे. पण, अथर्वशीर्ष केवळ गणपतीसमोरच का म्हणतात? चला तर जाणून घेऊया.

अथर्वशीर्ष म्हणजे काय?

हे उपनिषद गणक ऋषींनी रचले आहे.

'थर्व' म्हणजे चंचल आणि 'अथर्व' म्हणजे स्थिर. 'शीर्ष' म्हणजे मस्तक.

ज्याच्या पठणामुळे बुद्धीला स्थिरता मिळते, तो ग्रंथ म्हणजे अथर्वशीर्ष.

यात प्रथम गणेशाच्या सगुण स्वरूपाची उपासना सांगितली आहे आणि शेवटी गणेशच परब्रह्म आहे, असे नमूद केले आहे.

गणपतीसमोर अथर्वशीर्ष म्हणण्याचे कारण

गणपती हा विघ्नहर्ता आणि बुद्धीचा अधिपती मानला जातो.

अथर्वशीर्षात गणपतीचे ज्ञानमय आणि विज्ञानमय स्वरूप वर्णन केलेले आहे. त्यामुळे त्याचे पठण केल्याने बुद्धीला स्थिरता आणि शुद्धता प्राप्त होते.

या पठणाने पापांचा नाश होतो, वाक्-सिद्धी मिळते आणि जीवनात यशाचा मार्ग सुकर होतो, असे मानले जाते.

गणपतीसमोर अथर्वशीर्ष म्हणणे म्हणजे त्याच्याशी थेट संवाद साधणे व त्याची प्रसन्नता मिळवणे.



अथर्वशीर्ष म्हणताना काही नियम सांगितलेले आहेत -

उच्चार शुद्ध ठेवणे.

स्नान करून, शुद्ध आसनावर बसून पठण करणे.

दक्षिण दिशा टाळून इतर दिशेला तोंड करून बसणे.

पूजा करून किंवा मनोभावे गणेशाचे ध्यान करून पठण सुरू करणे.

फलश्रुती

अथर्वशीषार्चा एक हजार वेळा जप केल्यास जे हवे ते फळ मिळते, अशी श्रद्धा आहे. एकवीस वेळा पठण म्हणजे एक संपूर्ण अभिषेक मानला जातो. म्हणूनच गणपतीसमोर अथर्वशीर्ष म्हणणे हे फक्त धार्मिक विधी नसून, बुद्धीची एकाग्रता, मनःशांती आणि गणेशाची कृपा मिळवण्याचा मार्ग आहे.

# ७ शुभ मुहुर्तावर द्या गणपती बाप्पाला निरोप; 'या' मंत्रांनी कल्याण होईल!

०६ सप्टेंबर २०२५ रोजी अनंत चतुर्दशी आहे. सार्वजनिक आणि हजारो घरगुती गणपती बाप्पांना या दिवशी निरोप दिला जातो. गणेश चतुर्थीला आगमन झालेल्या गणपतीचे विसर्जन करताना घरातील वातावरण अगदी भावपूर्ण झालेले असते. गणपती बाप्पाला जड अंतःकरणाने निरोप दिला जातो. दीड दिवसाचा, पाच दिवसाचा, सात दिवसाचा किंवा अगदी दहा दिवसाचा गणपती असला, तरी लाडक्या गणपती बाप्पाला निरोप देताना खूप वाईट वाटते. गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या, अशी आर्त विनवणी केली जाते. यंदा २०२५ च्या अनंत चतुर्दशीला गणपती बाप्पांना निरोप देण्यासाठी दिवसभर कोणते शुभ मुहूर्त आहेत, ते जाणून घेऊया...

यंदा, शनिवार, ०६ सप्टेंबर २०२५ रोजी अनंत चतुर्दशी आहे. शुक्रवार, ०५ सप्टेंबर २०२५ रोजी मध्यरात्री ०३ वाजून १२ मिनिटांनी भाद्रपद शुद्ध चतुर्दशीची सुरुवात होत आहे. तर, शनिवार, ०६ सप्टेंबर २०२५ रोजी मध्यरात्री ०१ वाजून ४१ मिनिटांनी अनंत चतुर्दशी समाप्त होईल. परंतु, शनिवार, ०६ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११.२२ वाजेपासून पंचक सुरू होत आहे. या दिवशी राहु काळ सकाळी ०९ ते १०.३० या कालावधीत आहे.

अनंत चतुर्दशी २०२५ गणपती विसर्जन शुभ मुहूर्त

- शुभ चौघडिया मुहूर्तः सकाळी ७ वाजून २६ मिनिटे ते ९ पर्यंत.
- अमृत काळः दुपारी १२ वाजून ५० ते २ वाजून २३ मिनिटे.
- लाभ चौघडिया मुहूर्तः दुपारी १ वाजून ५४ मिनिटे ते ३ वाजून २८ मिनिटे.
- अमृत चौघडिया मुहूर्तः दुपारी ३ वाजून २८ मिनिटे ते सायंकाळी ५ वाजून ०३ मिनिटे.
- सायंकाळी गोधूलि मुहूर्तः ६ वाजून ३७ मिनिटे ते ७ वाजता.
- सायंकाळी लाभ चौघडिया मुहूर्तः ७ वाजता ते ८ वाजून ०३ मिनिटे.
- सायंकाळी शुभ चौघडिया मुहूर्तः रात्रौ ९ वाजून २९ मिनिटे ते १० वाजून ५५ मिनिटे.



अनंत चतुर्दशी २०२५ गणपतीला निरोप देताना नामस्मरण अवश्य करा

बाप्पाची यथासांग पूजा करून त्याला प्रिय लाडू, मोदकांचा नैवेद्य दाखवून तो प्रसाद सर्व भाविकांना वाटा. बाप्पाचे विसर्जन करण्याआधी बाप्पाच्या सान्निध्यात काही काळ शांत बसून 'ॐ गं गणपतये नमः' या मंत्राचा जप करा. या मंत्राचा जप करून झाल्यावर पुढील मंत्र म्हणत बाप्पाला दुर्वांची जुडी अर्पण करा.

- ॐ गणाधिपाय नमः
- ॐ उमापुत्राय नमः
- ॐ विघ्ननाशनाय नमः
- ॐ विनायकाय नमः
- ॐ ईशपुत्राय नमः
- ॐ सर्वसिद्धप्रदाय नमः
- ॐ एकदन्ताय नमः
- ॐ इभवक्त्राय नमः
- ॐ मूषकवाहनाय नमः
- ॐ कुमारगुरवे नमः

गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या...!!!

# श्री वरदविनायक (महड), वरदान देणारा करुणामय देव



श्रीवरदविनायक मंदिर हे महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील महाड गावात वसलेले आहे. श्री वरदविनायक हे अष्टविनायकांपैकी चौथे गणपती मानले जाते. अष्टविनायक यात्रेत या मंदिराला विशेष स्थान आहे. हा गणपती 'वरदविनायक' (इच्छापूर्ती करणारा) म्हणून ओळखला जातो, कारण येथे भक्तांच्या सर्व मनोकामना पूर्ण होतात अशी श्रद्धा आहे. तसेच मंदिरातील गणपतीची मूर्ती स्वयंभू स्वतः प्रगट झालेली आहे आणि मंदिराला मठ असेही संबोधले जाते.

मंदिराची रचना- मंदिर साधे आणि कौलारू आहे, त्याला 25 फूट उंचीचा घुमट आणि सोनेरी कळस आहे. कळसावर नागाची नक्षी आहे. तसेच मंदिराच्या चारही बाजूंना चार हत्तींच्या मूर्ती कोरलेल्या आहे. तसेच मंदिरात दोन मूर्ती असून एक शेंदूर माखलेली (डाव्या सोंडेची) आणि दुसरी शुभ्र संगमरवरी (उजव्या सोंडेची) आहे. 1690 मध्ये धोंडू पौडकर यांना तलावात सापडलेली मूर्ती गाभाऱ्याबाहेर ठेवली आहे, तर नवीन मूर्ती गाभाऱ्यात आहे.

मंदिराच्या उत्तरेला गौमुख आहे, जिथून पवित्र तीर्थ प्रवाहित होते, आणि पश्चिमेला पवित्र तलाव आहे. मंदिरात नंददीप नावाचा दिवा 1892 पासून सतत प्रज्वलित आहे.

वैशिष्ट्ये- भक्तांना गणपतीच्या मूर्तीला स्पर्श करून स्वतः पूजा आणि अभिषेक करण्याची परवानगी आहे, ही इतर मंदिरांपेक्षा अनोखी परंपरा आहे. तसेच मंदिरात रिद्धी-सिद्धी, मुषिका, नवग्रह आणि शिवलिंग यांच्या मूर्तीही आहे.

पौराणिक कथा- फार प्राचीन काळी भीम नावाचा एक शूर व दानी राजा होऊन गेला. त्याला मूलबाळ नसल्याने तो दुःखी होता. तेव्हा तो आपल्या राणीसह अरण्यात गेला. त्याचे दुःख जाणून विश्वामित्र ऋषींनी त्याला एकाक्षर मंत्राचा जप दिला. मग राजाने उग्र तपश्चर्या सुरु केली. त्यामुळे विनायक त्याच्यावर प्रसन्न झाला. "तुलालवकरचपुत्रप्राप्ती होईल" असा त्याने राजाला वर दिला.काही दिवसांनी राजाला एक पुत्र झाला. त्याचे नाव रुक्मांगद. रुक्मांगद मोठा झाल्यावर राजाने सारा राज्यकारभार त्याच्यावर सोपविला व त्यालाही एकाक्षर मंत्राचा जप करण्यास सांगितले.एकदा रुक्मांगद शिकारीसाठी वनात भटकत असता तो वाचक्नवी ऋषींच्या आश्रमात गेला. त्या ऋषीच्या पत्नीचे नाव होते मुकुंदा. रुक्मांगदाला पाणी देताना मुकुंदा त्याच्यावर अनुरक्त झाली, पण रुक्मांगदाने तिची इच्छा पूर्ण केली नाही. त्यामुळे कामविव्हल झालेल्या मुकुंदेने 'तू कुष्ठरोगी होशील' असा रुक्मांगदाला शाप दिला. शाप मिळता क्षणीच सुवर्णाप्रमाणे कांती असलेले रुक्मांगदाचे शरीर कुष्ठरोगाने विद्रूप झाले. त्यामुळे दुःखी झालेला रुक्मांगद अरण्यात भटकत असता त्याला नारदमुनी भेटले. त्यांच्या आदेशानुसार रुक्मांगदाने कदंब नगरातील कदंब तीर्थात स्नान केले व तेथील चिंतामणी गणेशाची आराधना केली. त्यामुळे रुक्मांगद रोगमुक्त झाला.इकडे त्या मुकुंदेची अवस्था लक्षात घेऊन इंद्राने रुक्मांगदाचे रूप घेतले व मुकुंदेची इच्छा पूर्ण केली. त्याच्यापासून मुकुंदेला पुत्र झाला. त्याचे नव गृत्समद. हाच तो ऋग्वेदातील प्रसिद्ध मंत्रद्रष्टा व द्वितीय मंडळाचा करता. गृत्समदाच्या जन्माची कथा सर्वांना माहित झाली होती. त्यामुळे त्याचा पदोपदी पाणउतारा होऊ लागला. मातेच्या पापाचरणामुळे सर्वजण गृत्समदाला हीन लेखू लागले. तेव्हा गृत्समदाने आईकडून सत्य जाणून घेतले व तिला शाप दिला. मग तो पापक्षालनार्थ पुष्पक (भद्रक) वनात तप करू लागला. त्याने विनायकाची आराधना केली. त्यामुळे विनायक प्रसन्न झाला. विनायकाने त्याला वर मागण्यास सांगितले. तेव्हा तो म्हणाला, "तू याच वनात वास्तव्य करून भक्तांच्या इच्छा पूर्ण कर." विनायकाने ते मान्य केले व त्या वनात राहू लागला. ते पुष्पक किंवा भद्रक वन म्हणजेच आजचे महाड क्षेत्र. या ठिकाणी गृत्समदाला वर मिळाला म्हणून येथील विनायकाला 'वरद विनायक' म्हणतात. गृत्समद हा गाणपत्य संप्रदायाचा आद्य प्रवर्तक समजला जातो. पुरातन काळात महडचे नांव मणिपूर वा मणिभद्र होते

उत्सव- गणेश चतुर्थी आणि माघ प्रतिपदा ते पंचमी येथे विशेष उत्सव साजरे होतात. माघी चतुर्थीला पुत्रप्राप्तीसाठी भक्त मोठ्या संख्येने येतात, कारण येथील प्रसादरूपी नारळ सेवनाने पुत्रप्राप्ती होते अशी श्रद्धा आहे.

श्री वरदविनायक महड जावे कसे?

रस्ता मार्ग-श्री वरदविनायक मंदिर पुणे-मुंबई महामागार्पासून ३-४ किमी अंतरावर आहे. खोपोलीपासून ६ किमी, लोणावळ्यापासून २१ किमी, आणि कर्जतपासून २५ किमी अंतरावर आहे.

# प्रसिद्ध जागृत बोहरा गणेश मंदिर उदयपूर

बोहरा गणेश मंदिर हे राजस्थानातील उदयपूर येथे भगवान गणेशाला समर्पित एक प्राचीन हिंदू मंदिर आहे. हे मंदिर सुमारे ३५०-५०० वर्षे जुने असल्याचे मानले जाते आणि ते महाराणा मोखल सिंह किंवा महाराणा राजसिंह यांच्या कारकिर्दीत बांधले गेले होते. मंदिराचे नाव 'बोहरा' व्यापारी समुदायावरून प्रेरित आहे, कारण असे मानले जाते की या समुदायाचे लोक व्यवसायात यश मिळावे म्हणून येथे प्रार्थना करण्यासाठी येत असत. वैशिष्ट्ये- मंदिरात नृत्य स्वरूपात भगवान गणेशाची उत्तराभिमुख मूर्ती आहे, जी मध्ययुगीन काळात लोकप्रिय होती. मूर्तीच्या हातात मोदक आणि वरद हस्त मुद्रा आहे. एक लहान मूर्ती देखील आहे, जी गणेशाची ₹पुस्तकधारी₹ असल्याचे मानले जाते. मंदिर लाल दगडापासून बनलेले आहे आणि त्याचे मुख्य प्रवेशद्वार उत्तरेकडे आहे. या मंदिरात अशी विशेष श्रद्धा आहे की येथे येणाऱ्या भाविकांच्या इच्छा पूर्ण होतात. पूर्वी भाविक त्यांच्या गरजा कागदावर लिहून मंदिरात ठेवत असत आणि त्यांची इच्छा पूर्ण झाल्यानंतर ते व्याजासह रक्कम परत करत असत. ही परंपरा आता प्रतीकात्मक स्वरूपात सुरू आहे. उत्सव- गणेश चतुर्थी या उत्सवात मंदिरात एक मोठा मेळा भरतो, ज्यामध्ये देश-विदेशातून लाखो भाविक (२-२.५ लाख) दर्शनासाठी येतात. मंदिराची भव्य सजावट केली जाते आणि छप्पन भोग आयोजित केला जातो. ऐतिहासिक महत्त्व- मंदिराचे नाव पूर्वी ₹बोर गणेश जी₹ होते, जे नंतर बोहरा गणेश जी म्हणून प्रसिद्ध झाले. हे मंदिर उदयपूरमध्ये लग्न, व्यवसाय सुरू करणे किंवा वाहन खरेदी करणे यासारख्या शुभ कार्यांपूर्वी पहिले निमंत्रण देण्याच्या परंपरेसाठी ओळखले जाते. मंदिराची लोकप्रियता इतकी आहे की आजूबाजूचा परिसर देखील त्याच्या नावाने ओळखला जातो.मंदिरात, भाविक गणेशासमोर असलेल्या मूषक (उंदीर) च्या कानात त्यांच्या इच्छा कुजबुजतात, जो इच्छा पूर्ण करण्याचे प्रतीक मानला जातो. हे मंदिर केवळ धार्मिकच नाही तर सांस्कृतिक आणि ऐतिहासिक दृष्टिकोनातूनही महत्त्वाचे आहे आणि उदयपूरला भेट देणाऱ्या पर्यटकांसाठी एक प्रमुख आकर्षण आहे.



बोहरा गणेश मंदिर उदयपूर जावे कसे?

रेल्वे मार्ग- हे मंदिर उदयपूर शहर रेल्वे स्टेशनपासून सुमारे ४ किमी अंतरावर आहे. रेल्वे स्टेशनवरून कॅब किंवा रिक्षेच्या मदतीने मंदिरापर्यंत सहज पोहचता येते. तसेच उदयपूर विमातळावरून देखील कॅब किंवा रिक्षा करून जात येते. व उदयपूर शहर हे अनेक शहरांना जोडले असल्याने बस सेवा देखील उपलब्ध आहे.

# श्री चिंतामणी गणेश मंदिर उज्जैन

श्री चिंतामणी गणेश मंदिर हे मध्य प्रदेशातील उज्जैन येथे स्थित एक प्राचीन आणि प्रसिद्ध तीर्थस्थळ आहे. हे मंदिर भगवान गणेशाला समर्पित आहे आणि उज्जैनमधील सर्वात जुन्या मंदिरांपैकी एक मानले जाते. मंदिराचे नाव ₹चिंतमणी₹ आहे कारण असे मानले जाते की येथे दर्शन घेतल्याने भक्तांच्या सर्व चिंता दूर होतात आणि त्यांच्या इच्छा पूर्ण होतात. हे मंदिर उज्जैनपासून सुमारे ६-८ किमी अंतरावर असलेल्या जावस्य गावात फतेहाबाद रेल्वे मार्गाजवळ क्षिप्रा नदीच्या काठावर आहे. असे मानले जाते की चिंतामण गणेश चिंतामुक्ती प्रदान करतो, तर इच्छामन आपल्या भक्तांच्या इच्छा पूर्ण करतो. गणेशाचे सिद्धिविनायक रूप यश प्रदान करते. या अद्भुत मंदिराच्या मूर्ती स्वयंनिर्मित आहेत. गर्भगृहात प्रवेश करण्यापूर्वी वर पाहताच, चिंतामण गणेशाचा एक श्लोक देखील लिहिलेला दिसतो.

वैशिष्ट्ये- तीन रूपांमध्ये गणेश असलेल्या या मंदिराचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे येथे चिंतामणी, इच्छामन आणि सिद्धिविनायक या तीन रूपांच्या स्वयंप्रकाशित मूर्ती एकत्र बसलेल्या आहेत.

चिंतामणीः चिंता दूर करणारा.

इच्छामनः भक्तांच्या इच्छा पूर्ण करणारा.

सिद्धिविनायकः यश आणि समृद्धी देणारा.

तसेच हे वैशिष्ट्य या मंदिराला इतर गणेश मंदिरांपेक्षा वेगळे बनवते.

पौराणिक कथा- पौराणिक कथेनुसार, हे मंदिर त्रेतायुगात भगवान श्री राम यांनी स्थापन केले होते. जेव्हा श्री राम, माता सीता आणि लक्ष्मण त्यांच्या वनवासात येथे आले तेव्हा माता सीता तहानलेली होती. लक्ष्मणाने बाण मारला आणि पाणी काढले, ज्यामुळे लक्ष्मण बावडी निर्माण झाली, जी आजही मंदिराजवळ आहे. असे मानले जाते की श्री रामांनी येथे चिंतामणी गणेशाची स्थापना केली, लक्ष्मणाने इच्छामनची स्थापना केली आणि माता सीतेने सिद्धिविनायकाची स्थापना केली. काही कथांमध्ये असेही म्हटले आहे की भगवान शिव यांनी या मंदिरात पूजा केली. तसेच मंदिरात स्थापित गणेशाच्या मूर्ती स्वतःहून प्रकट झाल्या आहेत असे मानले जाते, ज्यामुळे त्याची आध्यात्मिक शक्ती वाढते.

ऐतिहासिक महत्त्व- चिंतामणी गणेश मंदिर परमार काळातील आहे, जे ९ व्या ते १३ व्या शतकातील असल्याचे मानले जाते आणि त्याचे सध्याचे स्वरूप १८ व्या शतकात महाराणी अहिल्याबाई होळकर यांनी नूतनीकरण केल्यानंतर तयार केले गेले. मंदिराची वास्तुकला परमार शैलीचे प्रतिबिंबित करते, ज्यामध्ये खांबांवर बारीक कोरीवकाम पाहिले जाऊ शकते.तसेच येथे भाविक त्यांच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी मंदिराच्या भिंतीवर उलटा स्वस्तिक काढतात आणि त्यांच्या इच्छा पूर्ण झाल्यावर सरळ स्वस्तिक काढून कृतज्ञता व्यक्त करतात. भाविक इच्छा करताना रक्षासूत्र बांधतात आणि त्यांची इच्छा पूर्ण झाल्यावर ते सोडण्यासाठी येतात.

उत्सव- गणेश चतुर्थी, तिल चतुर्थी, रक्षाबंधन आणि चैत्र महिन्याच्या प्रत्येक बुधवारी येथे विशेष पूजा आणि उत्सव आयोजित केले जातात.

श्री चिंतामणी गणेश मंदिर उज्जैन जावे कसे?

रेल्वे मार्ग-उज्जैन जंक्शन रेल्वे स्टेशन मंदिरापासून सुमारे ६ किमी अंतरावर आहे. येथून टॅक्सी, ऑटो किंवा कॅबने मंदिरापर्यंत पोहोचता येते.

रस्ता मार्ग- उज्जैन बस स्थानकापासून देखील मंदिर ८ किमी अंतरावर आहे. मध्य प्रदेशातील सर्व प्रमुख शहरांमधून उज्जैनसाठी नियमित बसेस उपलब्ध आहे.

विमानमार्ग- सर्वात जवळचे विमानतळ इंदूरमधील देवी अहिल्याबाई आंतरराष्ट्रीय विमानतळ आहे, जे उज्जैनपासून सुमारे ६० किमी अंतरावर आहे.

# शिल्पा शेट्टी आणि राज कुंद्रा यांच्यावर ६० कोटी रुपयांच्या फसवणुकीचा आरोप, मुंबई पोलिसांनी धाडली लूकआउट नोटीस



**■मुंबई। प्रतिनिधी :**

मुंबई पोलिसांनी शिल्पा शेट्टी आणि राज कुंद्रा यांच्याविरुद्ध ६० कोटी रुपयांच्या फसवणुकीच्या प्रकरणात लूकआउट नोटीस जारी केली आहे. त्यांच्यावर उद्योगपती दीपक कोठारी यांच्याकडून गुंतवणुकीच्या नावाखाली पैसे घेतल्याचा आणि ते वैयक्तिक वापरासाठी वापरल्याचा आरोप आहे. हा खटला त्यांच्या कंपनी बेस्ट डील टीव्हीशी संबंधित आहे. पोलिसांनी फसवणुकीच्या आरोपाखाली बीएनएसच्या कलम ४०३, ४०६ आणि ३४ अंतर्गत एफआयआर दाखल केला आहे. एका अधिकाऱ्याने सांगितले की, मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने त्यांच्या वारंवार होणाऱ्या आंतरराष्ट्रीय दौऱ्यांमुळे या जोडप्याविरुद्ध लूकआउट नोटीस जारी केली आहे. १४ ऑगस्ट रोजी शिल्पा शेट्टी आणि राज कुंद्रा यांच्याविरुद्ध जुहू पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. कर्ज आणि गुंतवणुकीच्या नावाखाली मुंबईतील व्यावसायिक दीपक कोठारी याची सुमारे ६० कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. दीपक कोठारी हे लोटस कॅपिटल फायनान्शियल सर्व्हिसेसचे संचालक आहेत, त्यांनी सांगितले की राजेश आर्य यांनी त्यांची शिल्पा आणि राज यांच्याशी ओळख करून दिली होती. त्यावेळी शिल्पा आणि राज कुंद्रा यांचा बेस्ट डील टीव्हीमध्ये ८७.६% हिस्सा होता. दीपक कोठारी यांच्या मते, सुरुवातीला शिल्पा आणि राज कुंद्रा यांनी त्यांच्याकडे १२% व्याजदराने ७५ कोटी रुपयांचे कर्ज मागितले होते, परंतु नंतर त्यांनी कराचा बोजा कमी करण्यासाठी गुंतवणूक असल्याचे सांगून पैसे देण्यास राजी केले आणि दरमहा परतावा आणि मुद्दल दोन्ही परत मिळतील असे आश्वासन दिले. दीपक कोठारी यांनी दावा केला की त्यांनी एप्रिल २०१५ मध्ये शेअर सबस्क्रिप्शन करारांतर्गत ३१.९५ कोटी रुपये आणि सप्टेंबर २०१५ मध्ये पूरक कराराद्वारे २८.५३ कोटी रुपये हस्तांतरित केले. ही संपूर्ण रक्कम कंपनीच्या एचडीएफसी बँक खात्यात जमा करण्यात आली. मात्र, शिल्पा शेट्टी यांनी सप्टेंबर २०१६ मध्ये कंपनीच्या संचालक पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर, दुसऱ्या करारात अनियमितता आढळल्याने २०१७ मध्ये बेस्ट डील टीव्हीविरुद्ध दिवाळखोरीची कारवाई सुरू झाली. दीपक कोठारी यांचा आरोप आहे की त्यांनी राजेश आर्य यांच्यामार्फत अनेकवेळा त्यांचे पैसे परत मिळवण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांना यश आले नाही. त्यानंतर त्यांनी औपचारिक तक्रार दाखल केली.

# निवडणूक कामकाजातील बीएलओ, पर्यवेक्षकांच्या मानधनात घसघशीत वाढ... नवे मानधन कधीपासून लागू?




**■नांदेड। प्रतिनिधी :**

'सन्मान कष्टाचा, आनंद उद्याचा' या लक्षवेधी घोषवाक्यासह बांधकाम कामगारांसाठी जाहीर करण्यात आलेल्या आर्थिक, शैक्षणिक आणि आरोग्यविषयक मदतीच्या महत्त्वाकांक्षी योजनेमध्ये बोगस लाभार्थी आणि दलालांचा शिरकाव झाला असून त्यामुळे वरील घोषवाक्यात ह्यसुळसुळाट दलालांचाह्ण या आणखी एका ओळीची भर पडली आहे. नांदेडच्या साहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयामार्फत शासनाच्या वरील योजनेची अंमलबजावणी केली जात आहे. या कार्यालयातील कामगार अधिकार्यांच्या अधिपत्याखाली बांधकाम कामगारांची नोंदणी व त्यांना शासकीय योजनेचा लाभ मंजूर करण्याची प्रक्रिया पार पाडली जाते. अलीकडे स्थानिक कामगार अधिकारी श्रीमती यास्मिन शेख यांनी काही प्रकरणांची पडताळणी केली असता, अभियांत्रिकी आणि वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेशाचे प्रकरण दाखवून दाखल करण्यात आलेल्या प्रस्तावांमध्ये चार बोनाफाईड प्रमाणपत्रे खोटी व बनावट असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर या महिला अधिकार्याने संबंधित अर्जदारांविरुद्ध शासनाची फसवणूक करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल शिवाजीनगर पोलीस ठाण्यात लेखी तक्रार सादर केली. तथापि अशा प्रकरणांत थेट गुन्हा दाखल करण्यापूर्वी पोलीस अधीक्षक कार्यालयाची परवानगी घेणे बंधनकारक झाल्याचे त्यांना पोलीस ठाण्यातून सांगण्यात आले.

# महाराष्ट्रातील 'या' गावात विहिरीला गरम पाणी; थंड पाणी मिसळल्याशिवाय हातही घालता येईना



**■कमलापूर। प्रतिनिधी:**

अहेरी तालुक्यातील कमलापूरपासून दोन किलोमीटरवरील ताटीगुडम गावात ४ सप्टेंबरला आश्चर्यजनक प्रकार समोर आला आहे. गावातील एका विहिरीला चक्क गरम पाणी येत असून, त्यामुळे परिसरात कुतूहल निर्माण झाले आहे. तालुका प्रशासन याबाबत अनभिज्ञ असून, भूगभार्तील उष्ण खडकाचा हा परिणाम असू शकतो, असा अंदाज तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

हे पाणी एवढे गरम आहे की, त्यात थंड पाणी मिसळल्याशिवाय हातही घालता येत नाही, असे प्रत्यक्षदशीर्नी सांगितले. त्यामुळे ग्रामस्थांत मोठे कुतूहल निर्माण झाले आहे. वैज्ञानिक दृष्टीने याचा योग्य तो निष्कर्ष काढणे गरजेचे आहे.

सत्यांना मलय्या कटकू (रा. ताटीगुडम) हे शेती करतात. घराजवळच त्यांनी विहीर खोदली आहे. यंदा मुसळधार पाऊस झाल्याने त्यांच्या विहिरीलाही पाणी आले. ४ सप्टेंबरला त्यांच्या विहिरीतून गरम पाणी येत असल्याचे निदर्शनास आले. ही वार्ता संपूर्ण परिसरात पोहोचली.

यासंदर्भात अहेरीचे तहसीलदार बालाजी सोमवंशी यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी मला या घटनेची माहिती नाही, असे सांगितले. यासंदर्भात माहिती घेऊन सांगतो, असे ते म्हणाले.

# महाराष्ट्रात वाघांनी घेतला २१८ जणांच्या नरडीचा घोट, देशात सर्वाधिक हल्ले राज्यात

**■अमरावती। प्रतिनिधी:**

जागतिक स्तरावर वाघांच्या संख्येत भारत अव्वलस्थानी असला, तरी वाघ आणि मानव यांच्यातील संघर्ष दिवसागणिक वाढत आहे. सन २०२० ते २०२४ या कालावधीत देशभरात वाघांच्या हल्ल्यात तब्बल ३७८ जणांचा मृत्यू झाला असून, त्यापैकी एकट्या महाराष्ट्रात २१८ मृत्यू झाले आहेत. विशेषतः चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात मृत्यूची आकडेवारी सर्वाधिक आहे. तर मेळघाटात गेल्या तीन वर्षात सहा जणांचे बळी गेले आहेत.



राज्यात ताडोबा-अंधारी, नवेगाव-नागझिरा, पेंच, मेळघाट, बोर व सह्याद्री, असे सहा व्याघ्र प्रकल्प आहेत. तर, ४८ अभयारण्ये असून, ४ संवर्धन राखीव क्षेत्रे आहेत. व्याघ्र प्रकल्पात जागा अपुरी पडत असल्याने वाघांनी नवा कॉरिडॉर शोधला असून, नजीकच्या राखीव जंगलाच्या दिशेने त्यांनी मुक्काम हलविल्याने मानव-वन्यजीव संघर्ष होत असल्याची माहिती वन्यजीव अभ्यासक यादव तरटे पाटील यांनी बोलताना दिली. गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्रात वाघांची संख्या वाढत असली तरी त्यांच्या मृत्यूची संख्याही वाढलेली आहे. विविध कारणांमुळे वाघांचा मृत्यू होत आहे, ज्यात नैसर्गिक मृत्यू, दोन वाघांमधील संघर्ष आणि मानवी हस्तक्षेपामुळे होणारे अनैसर्गिक मृत्यू, शिकार, अपघात, विद्युतधक्का आदींचा समावेश आहे.

मानव-वन्यजीव संघर्ष या गंभीर समस्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी सरकार विविध उपाययोजना करत आहेत. मानवी वस्तीजवळ फिरणाऱ्या वाघांवर लक्ष ठेवणे, त्यांना पुन्हा जंगलात सोडणे आणि लोकांना यासंदर्भात जागरूक करणे, ही प्रक्रिया निरंतर सुरूच आहे.

गत पाच वर्षांत वाघांच्या मृत्यूची आकडेवारी (स्त्रोत : राष्ट्रीय व्याघ्र प्राधिकरण)

२०२० - १०६
२०२१ - १२७
२०२२ - १२१
२०२३ - १७८
२०२४ - १२४

जानेवारी-एप्रिल २०२५ : ६२ (यामध्ये महाराष्ट्रात सर्वाधिक २० मृत्यू नोंदवले गेले आहेत.)

देशात वाघांच्या हल्ल्यात ३७८ मानवी मृत्यूची नोंद झाली असून, त्यापैकी सर्वाधिक २१८ मृत्यू महाराष्ट्रात झालेत.

# सनातन संस्था आणि हमीद दाभोलकरांबाबत उच्च न्यायालयाचा महत्त्वाचा निर्णय




**■भाईंदर। प्रतिनिधी:**

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक नरेंद्र दाभोलकर यांचा मुलगा हमीद दाभोलकर यांच्यासह काही पत्रकारांनी सनातन संस्थेकडून जीवाला धोका असल्याची व्यक्त केलेली भीती वाजवी आणि खरी असल्याचे निरीक्षण उच्च न्यायालयाने नुकतेच नोंदवले. तसेच, उजव्या विचारसरणीच्या संस्थेने त्यांच्याविरुद्ध दाखल केलेले मानहानीचे खटले गोव्यातील न्यायालयातून महाराष्ट्रात वर्ग करण्यास परवानगी दिली. सनातन संस्था आणि याचिकाकर्त्यांमधील वैचारिक शत्रुत्त्व तसेच त्या पार्श्वभूमीवर याचिकाकर्त्यांनी व्यक्त केलेली भीती विचारात घेतल्यास त्यांच्याविरुद्ध गोव्यातील न्यायालयात दाखल मानहानीचे खटले महाराष्ट्रातील न्यायालयात खटले वर्ग करणे योग्य होईल, असेही न्यायमूर्ती निजामुद्दीन जमादार यांच्या एकलपीठाने स्पष्ट केले. त्याचप्रमाणे, याचिकाकर्त्यांविरोधातील सर्व खटले गोव्यातील फोंडा येथील न्यायालयातून कोल्हापूर येथील न्यायालयात वर्ग करण्याचे आदेश दिले. तथापि, संस्थेच्या विनंतीवरून न्यायालयाने सहा आठवड्यांसाठी आपल्या आदेशाच्या अंमलबजावणीला स्थगिती दिली. दरम्यान, दाभोलकर हत्येप्रकरणी दोघांना दोषी ठरवण्यात आले असून सनातन संस्था आणि इतर संघटनांनी दाभोलकरांच्या अंधश्रद्धेविरुद्धच्या कारवायांना तीव्र विरोध केला होता, असे सत्र

# शिक्षक सेवेत असणाऱ्या शिक्षकांसाठी सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय

**■नागपूर। प्रतिनिधी:**



खडतर अर्थात जास्त काठीण्य पातळी असणारी शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारासाठी ही बातमी महत्वाची आहे. परिश्रम, सखोल अभ्यास, नियोजन, कुशाग्र या चारसूत्रीच्या पाठबळावर ही परीक्षा पास करणाऱ्या भावी गुरुजींना पात्रता प्रमाणपत्राची मागील तब्बल सहा महिन्यापासून आतुरतेने प्रतीक्षा होती. परीक्षेचा ऑनलाईन निकाल सहा महिन्यापूर्वी जाहिर होऊनही हाती प्रमाणपत्र मिळाले नाही. एक दोन महिने नव्हे तब्बल सहा महिन्यापासून उमेदवारांची प्रतीक्षा कायम होती. त्यांचे जीव टांगणीला लागले होते. त्यानंतर टीईटी परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. मात्र आता शिक्षक सेवेत असणाऱ्या शिक्षकांसाठी सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निकाल जाहीर केलेला आहे. काय आहे ते बघूया. सेवेत कायम राहण्यासाठी किंवा पदोन्नतीसाठी शिक्षकांनी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) देणे व उत्तीर्ण होणे अनिवार्य असल्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी दिला. ही परीक्षा देणे बंधनकारक आहे का असा सवाल उपस्थित करत महाराष्ट्र, तामिळनाडूसह काही राज्यांनी दाखल केलेल्या याचिकांवर हा निकाल देण्यात आला. राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने (एनसीटीई) २०१० मध्ये इयत्ता १ ते ८ पर्यंतच्या शिक्षकांच्या नियुक्तीसाठी किमान शैक्षणिक अर्हता ठरवली होती. त्यानंतर एनसीटीईने टीईटी परीक्षा सुरू केली.

न्यायालयाचा निर्णय काय?

सर्वोच्च न्यायालयाचे न्या. दीपांकर दत्ता, न्या. ऑगस्टिन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठाने म्हटले आहे की, ज्या शिक्षकांना निवृत्त होण्यासाठी पाच वर्षे शिल्लक आहेत तेच फक्त परीक्षा न देता आपल्या सेवेचा कालावधी पूर्ण करू शकतील.

# गणपती विसर्जनासाठी विरार पोलिसांचे विशेष नियोजन



**■विरार। प्रतिनिधी:**

वसई -विरार शहर महानगरपालिकेच्या हद्दीत यंदाही गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. शहरातील विविध सार्वजनिक गणेश मंडळांकडून मोठ्या प्रमाणात गणेशमूतीर्ची प्रतिष्ठापना करण्यात आली असून, ११ दिवसांच्या विसर्जनाच्या दिवशी हजारो गणेशभक्त रस्त्यावर येत असतात. या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी विरार पोलिसांनी विशेष बंदोबस्त आणि नियोजनाची आखणी केली आहे. विसर्जन मिरवणुका म्हणजे जल्लोष, भक्तिभाव आणि सामाजिक एकत्रिकतेचा संगम असतो. मात्र याच गदीर्चा गैरफायदा घेत काही समाजकंटक अनुचित प्रकार करत असतात. विशेषतः महिला आणि मुलींविरोधात होर्णाया छेडछाडीच्या घटनांवर यंदा कठोर कारवाईचे धोरण राबवले जाणार आहे. पोलिसांनी अशा घटनांवर लक्ष ठेवण्यासाठी विशेष पथके असणार आहेत. तसेच, मिरवणुकीदरम्यान होर्णाया पाकीटमारांच्या हालचालींवरही पोलिसांची बारीक नजर राहणार आहे. गदीर्चा फायदा घेत चोरी करर्णाया टोळ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी सिव्हिल ड्रेसमध्ये पोलिसांची गुप्त पथके कार्यरत राहणार आहेत. तसेच सीसीटीव्ही कॅमेर्यांच्या माध्यमातून देखील मिरवणूक मार्गावर सातत्याने नजर ठेवली जाणार आहे.

# मुंबई विद्यापीठाचा 'परफॉर्मन्स' सुधारला; नॅशनल इन्स्टिट्युशनल रँकिंगमध्ये ५६ व्या स्थानावर

**■मुंबई। प्रतिनिधी:**



नॅशनल इन्स्टिट्युशनल रँकिंग फ्रेमवर्कमध्ये (एनआयआरएफ) देशातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठांच्या रँकिंगमध्ये मुंबई विद्यापीठाने ६१व्या स्थानावरून ५४व्या स्थानी झेप घेतली आहे. त्याचवेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची कामगिरी खालावली असून, २३व्या स्थानावरून ५६व्या स्थानी घसरण झाली आहे. देशातील सर्वोत्कृष्ट विद्यापीठांच्या तुलनेत मुंबई विद्यापीठाची कामगिरी तीन वर्षांपासून घसरत होती. सन २०२२ मध्ये ४५व्या स्थानी, २०२३ मध्ये ५६व्या स्थानी आणि २०२४ मध्ये ६१व्या स्थानी मुंबई विद्यापीठाची घसरण झाली होती. यंदा ही घसरगुंडी थांबली. त्याचवेळी देशातील १०० सर्वोत्कृष्ट शिक्षणसंस्थांच्या यादीतही मुंबई विद्यापीठाची घसरण झाली होती. विद्यापीठ २०२० मध्ये ९५, तर २०२१ मध्ये ९६व्या स्थानी होते. त्यात काहीशी सुधारणा होऊन २०२२ मध्ये शिक्षणसंस्थांच्या यादीत ८१व्या स्थानी पोहोचले होते.

रँकिंगमध्ये सुधारणा

आयआयटी- मुंबईने यंदाही सर्वोत्कृष्ट शिक्षणसंस्थांच्या यादीत तिसरे स्थान कायम राखले आहे. देशातील इनोव्हेशनमधील सर्वोत्कृष्ट शिक्षणसंस्थांच्या क्रमवारीत आयआयटी- मुंबईची पहिल्या स्थानावरून दुसऱ्या स्थानी घसरण झाली आहे. तसेच नव्याने स्थापना केलेल्या आयआयएम-मुंबईने सहावे स्थान यंदाही कायम राखले आहे. देशातील उच्चशिक्षण संस्थांतील स्पर्धात्मकता वाढावी यासाठी दरवर्षी नॅशनल इन्स्टिट्युशनल रँकिंग फ्रेमवर्क जाहीर केले जाते. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने २०२५ या वर्षाची रँकिंग जाहीर केली. सर्वोत्कृष्ट १०० शिक्षणसंस्थांच्या रँकिंगमध्ये होमी भाभा इन्स्टिट्यूटच्या कामगिरीत २७व्या स्थानावरून २०व्या स्थानापर्यंत सुधारणा झाली आहे.

इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी संस्थेचे स्थान २०२३ मध्ये ४१ होते. गेल्यावर्षी ते ५६ झाले. यंदा आणखी घसरण होऊन संस्था ६४व्या स्थानी गेली हे, तर टाटा समाजविज्ञान संस्थेला या यादीत पहिल्या १०० संस्थांमध्ये स्थान मिळाले नाही.

# शाळांना ईदच्या सुट्टीवरून सावळागोंधळ; शिक्षण उपसंचालक आणि पालिका शिक्षण विभागाचे वेगवेगळे आदेश

**■मुंबई। प्रतिनिधी:**



राज्य शासनाच्या आदेशानुसार शिक्षण उपसंचालकांनी 'ईद ए मिलाद' निमित्ताने ५ सप्टेंबरऐवजी ८ सप्टेंबरला शाळांना सुट्टी देण्याचा निर्णय घेतला. तर, पालिकेच्या शिक्षण विभागाने ५ व ८ सप्टेंबर दोन्ही दिवशी सुट्टीचा पर्याय घेतला. या गोंधळात भर टाकत खासगी शाळांनी उपसंचालकांच्या आदेशानुसार ८ ला सुट्टी दिली आहे. हा ह्यसुट्टीगोंधळह्ण चचेर्चा विषय ठरला आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ५ ऐवजी ८ सप्टेंबर रोजी ईदचा जुलूस काढण्याचे मुस्लीम समुदायाने निश्चित केले. त्यानंतर शासनाने ८ सप्टेंबर रोजी मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये सार्वजनिक सुट्टी जाहीर केली. मात्र, शिक्षण उपसंचालकांनी ५ सप्टेंबर रोजी खासगी शाळा सुरू राहतील आणि ८ सप्टेंबरला त्या बंद राहतील, असा आदेश जारी केला. मात्र, ५ सप्टेंबरकरिता काही खासगी शाळांनी पूर्वनियोजित सुट्टी जाहीर केली असल्याने खासगी शाळांच्या शिक्षकांमध्ये संभ्रम निर्माण झाला असल्याचे शिक्षक संघटनांचे म्हणणे आहे. पालिका शाळांच्या सोमवार, ८ सप्टेंबरच्या सुट्टीसाठी भरपाई वर्ग घेण्याचेही आदेश देण्यात आले आहेत. शासनाने ५ सप्टेंबर रोजी सुट्टी जाहीर केली. तर, शिक्षण उपसंचालकांनी त्याच दिवशी खासगी शाळा सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला. मात्र, काही खासगी शाळांनी पूर्वनियोजित सुट्टी जाहीर केलेली आहे. त्यामुळे त्यांच्या गोंधळात भर पडणार आहे.

# प्रवाशांनी लावला रेल्वेला चुना, त्यामुळे आता स्थानकात क्यूआर तिकीट बंद; प्रशासनाचा निर्णय



**■मुंबई। प्रतिनिधी:**

मध्य रेल्वेच्या लोकल स्थानकावरील स्टॅटिक क्यूआर कोडद्वारे पेपरलेस मोबाइल तिकीट बुकिंग गुरुवारपासून बंद करण्यात आली. रेल्वेच्या यूटीएस ऍपच्या माध्यमातून स्थानकात असलेले क्यूआर कोड स्कॅन करून तिकीट काढण्याच्या सुविधेचा प्रवाशांकडून गैरवापर सुरू होता. त्यामुळे ही सुविधा बंद करण्यासाठी मध्य रेल्वेने बोडार्ला जुलै महिन्यात पत्र पाठवले होते.

मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या जिओफेन्सिंग क्षेत्रात मुंबई लोकलचे तिकीट काढण्यासाठी रेल्वेने अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. यापैकी एक म्हणजे यूटीएस ऍप तिकीट काढताना प्रवाशांच्या वेळेची बचत व्हावी, त्यांचा प्रवास सुलभ व्हावा, यासाठी २०१६ मध्ये यूटीएस मोबाइल ऍप्लिकेशन सुरू केले. २०२४ या वर्षात मध्य रेल्वेवर दररोज सुमारे ६ लाख १० हजार प्रवाशांनी 'यूटीएस'चा वापर केला. या ऍपद्वारे स्टेशनवर क्यूआर कोड स्कॅन करून तिकीट काढता येते. परंतु, तिकीट नसलेले प्रवासी धावत्या ट्रेनमध्ये कोड स्कॅन करून तिकीट काढत असल्याने बंदी घातली आहे. मध्य रेल्वे प्रशासनाच्या या निर्णयाचा योग्य प्रकारे तिकीट काढून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना फटका बसला आहे.

कोड वेबसाइटवर उपलब्ध

रेल्वेचे कोड इंटरनेटवरील अनेक वेबसाइटवर सहज उपलब्ध आहेत. त्यामुळे तिकीट तपासनीस (टीसी) लोकलमध्ये येताच अनेक विनातिकीट प्रवास करणारे प्रवासी तो कोड स्कॅन करून तिकीट काढतात. तिकीट तपासनिसांकडून अशा वारंवार तक्रारी येत असल्याने ही सुविधा बंद केल्याचे अधिकारी म्हणाले. रेल्वे स्थानकातील क्यूआर कोड स्थिर आहेत. परिणामी, ते सहज गैरवापर करणाऱ्यांना उपलब्ध होऊ शकतात.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com